# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 07/01/2022 (शुक्रवार)
(सकाळ)

---

### जबरी संभोग

पो.स्टे. उमरेड :– दिनांक 01/01/2022 चे 06.00 वा. ते दिनांक 03/01/2022 चे 11.30 वा. पुर्वी फिर्यादी ही दि. 03/01/2022 रोजी सकाळी 11.30 वा. कामावरून घरी आली असता तिचा मजवा मुलगा वय 05 वर्षे पीडित याने सांगीतले की, 'विधीसंघर्ष बालक क्र. 1 व 2 हे मला तिन दिवसांपासुन त्यांचे घरी कोणी नसल्यावर आपले घरी खिचुन नेतात व अश्लिल कृत्य करतात' असे सांगीतले. फिर्यादीने घाबरल्यामुळे त्यांना काहीच म्हटले नाही व घाबरून पोलीस स्टेशन ला तक्रार ही दिली नाही. त्याचप्रमाणे घराशेजारी राहणाऱ्यांचा मुलगा वय 04 याचे सोबत सुध्दा अश्लिल कृत्य केल्याचे माहित झाले. त्यानंतर दि. 04/01/2022 रोजी फिर्यादीचा मुलगा सकाळपासुन शौचय व ओकारी करीत होता. त्याचे पार्श्वभागातुन रक्त येत असल्याने दि. 05/01/2022 ला जास्त त्रास झाल्याने फिर्यादी व तिचे पतीने मेडीकल कॉलेज नागपुर येथे उपचाराकरीता नेले असता घडलेली हकीकत सांगीतली डॉक्टरांनी सांगीतले तुमची केसे उमरेड ची आहे त्या दोघांचीही टेस्ट करावी लागेल नंतरच उपचार करता येईल.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 376(1)(3)(ए.बी) भादंवि. सहकलम 4 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनी खोब्रागडे मो क्र 8308082094 या करीत आहे.

### अनैसर्गिक संभोग

पो.स्टे. सावनेर :– दिनांक 02/01/2022 चे 14.00 वा. ते दिनांक 02/01/2022 चे 17.00 वा. पावेतो वसतीगृहातील मुलांचे राहण्याच्या हॉलमध्ये विधीसंघर्षग्रस्त बालक वय 16 वर्ष याने वसतीगृहातील पीडित मुलगा वय 14 वर्षे याच्यावर दि.02.01.2022 रोजी अनैसर्गिक संभोग केला. तसेच यापुर्वी देखील वसतीगृहात त्याच्यावर अनैसर्गिक संभोग केले आहे. त्याने मेयो हॉस्पीटल येथे डॉक्टरांना सांगीतले तसेच वसतिगृह अधिक्षिका व समुपदेशीका फिर्यादी यांना देखील सांगीतले वरून त्यांनी पीडित यास मा. बालकल्याण समिती, नागपुर यांचे समक्ष हजर केले असता त्यांनी पोलीसांकडे तक्रार करण्यास आदेशीत केल्यावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 377 भादंवि. सहकलम 3,4,5,6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनी रासकर हे करीत आहे.

# अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत वडोदा शिवार कमलेश ठवकर यांचे शेतात येथे दिनांक 05/01/2022 चे 05.00 वा. आकाश धर्मदास गणवीर (मृतक), वय 25 वर्ष, रा. हिरवी नगर नागपुर हे कमलेश ठवकर रा. वडोदा यांचा शेतावर वर्मा ठेकेदार यांचा कडे काम करायला नागपूर वरून आले. दि. 04/01/22 रोजी मृतकाचे मृत्युपुर्वी तो आणी राजकुमार सिलारे व राजीव राणा रात्री 20.00 वा. जेवण करून झोपले व सकाळी उठले असता आकाश गणवीर दिसला नाही. दि. 06/01/22 रोजी सकाळी राजकुमार व राजीव उठले तेव्हा राजीव राणा हा विहीरीवर पाणी चालु करण्यासाठी गेला तेव्हा त्यास आकाश गणवीर पाण्यावर तंरगतांनी दिसला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजकुमार सिलारे यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक कोमल कडु हे करीत आहे.

2) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत भिवापुर येथे दिनांक दि. 02/01/2022 रोजी 22.30 वा. दरम्यान सौ वैषाली गोपाल शेटे(मृतक), वय 38 वर्ष, रा. भिवापुर हिला डोक्याचा त्रास होता. त्या त्रासाला कंटाळून तिने तांदूळ मध्ये टाकण्याची औषध प्राषन केले. रात्रीला अचानक तिची प्रकृती बिगडल्याने गावातील डॉक्टरांना दाखविले असता त्यांनी पेशन्ट ला श्री हॉस्पीटल नागपूर येथे दि. 03/01/2022 चे 04.30 वा. पुढील उपचार करीता भरती केले. उपचारा दरम्याण दि. 03/01/2022 चे 08.30 वा सौ वैषाली शेटे हिचा मृत्यु झाला. पोस्टे सक्करदरा नागपूर यांच्या कडून कागदपत्रे प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोउपनि श्री अमोल घरात पो.स्टे सक्करदरा नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार चंद्रकांत रेवतकर मो. क्र.8888102302 हे करीत आहे.

3) पो.स्टे. अरोली :– अंतर्गत इजनी ता मौदा जि. नागपूर येथे दिनांक 05/01/2022 चे 12.48 वा. मृतक नामे राहुल गंगाराम डोंगरे(मृतक), वय 25 वर्ष रा. अजनी ता मौदा जि. नागपूर याने आपले शेतातील घरात विषारी औषध प्राषण केले. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास उपचाराकरिता सामान्य रुग्णालय भंडारा येथे दिनांक 27/12/2022 रोजी भरती केले होते. उपचारादरम्यान राहुल डोंगरे हा दिनांक 30/12/2022 चे 07.10 वा मरण पावला. याबाबत डॉक्टरी मेमो व कागदपत्रे पोलिस स्टेशन भंडारा येथे प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे मर्ग क 00/2021 कलम 174 जाफौ दाखल असुन सदरचा नंबरींग मर्ग पो.स्टे भंडारा जावक क 64/2022 दिनांक 02/02/2022 अन्वये प्राप्त झालयाने संदरचा नंबरींग मर्ग नोंद. सदर मर्ग चा पुढील तपास पोलिस हवालदार गणेश रॉय मो. नं. 9764382179 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर